**ठळक बातम्या**

- भारत हे नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाचं जागतिक केंद्र असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विवा टेक शिखर परिषदेत प्रतिपादन, फ्रान्समधल्या अग्रगण्य उद्योगपतींशी केली चर्चा

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी शांततेत मतदान

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने व्हिप जारी करत बोलवलेल्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित

**आणि**

- शैक्षणिक संस्थांच्या क्वाकरेली सिमोंड्स मानांकन यादीत पहिल्या २०० मध्ये आयआयटी मुंबईसह भारतातल्या ३ संस्थांचा समावेश

**<><><><><><>**

भारत हे नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाचं जागतिक केंद्र आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते पॅरिसमध्ये विवा टेक शिखर परिषदेत मार्गदर्शन करत होते. जिथं पारंपरिक उपाय तोकडे ठरतात त्या समस्यांचं निराकरण नवोन्मेषामुळे होऊ शकतं, असं ते म्हणाले. डिजिटल पेमेंट्स, आर्थिक समावेशकता, शिक्षण आरोग्यनिगा, कृषी अशा क्षेत्रांमध्ये भारतानं तंत्रज्ञानावर आधारित परिवर्तन कसं घडवून आणलं आहे, हे त्यांनी स्पष्ट केलं. तंत्रज्ञान हे प्रत्येक सर्वसामान्य नागरिकालाही उपलब्ध असलं पाहिजे, त्या दृष्टीनं भारत कृत्रिम बुद्धिमत्तेकडे सर्व समावेशक म्हणून पाहतो, असं ते म्हणाले. नुकत्याच झालेल्या भारत आणि यूरोपीय महासंघ यांच्यातल्या मुक्त व्यापार करारामुळे व्यापार, गुंतवणूक, पर्यटन आणि तंत्रज्ञान आदानप्रदान या क्षेत्रांना फायदा होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

फ्रान्स दौऱ्यात, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज फ्रान्समधल्या अग्रगण्य उद्योगपतींसोबत उच्चस्तरीय बैठका घेतल्या. उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सागरी पायाभूत सुविधा आदी विषयांवर या बैठकांमधे चर्चा झाली. भारत-फ्रान्स यांच्यात आर्थिक आणि उद्योग क्षेत्रातलं सहकार्य वृद्धिंगत करणं हे बैठकीचं उद्दिष्ट होतं.

मोदी यांनी सेंट गोबेनचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेनोट बेझिन यांची भेट घेतली. यावेळी हरित उत्पादन आणि शाश्वत पायाभूत सुविधा या विषयांवर चर्चा झाली. सेंट गोबेनमुळे भारतात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. तर हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रात भारत हा एक महत्त्वाचं उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून उदयाला येत  आहे, असं बेझिन म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी मिस्ट्रल एआयचे सीईओ अर्थुर मेन्श यांच्यासोबतही बैठक घेतली. आपली कंपनी भारतीय भाषांवर काम करायला, तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातली भागीदारी वाढवायला उत्सुक असल्याचं मेन्श यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. सीएमए सीजीएमचे कार्यकारी अधिकारी रोडॉल्फ सादे म्हणाले की भारत हा हरित नौवहन क्षेत्रात झपाट्यानं प्रगती करत आहे. सीएमए सीजीएम कंपनी भारतीय जहाजबांधणी कंपन्यांसोबत मिळून एलएनजीवर चालणारी सहा जहाजं बनवणार असल्याचंही त्यांनी सांगितिलं.

अल्स्टॉमचे कार्यकारी अधिकाऱ़ी मार्टीन सायन यांच्याशीही  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चर्चा केली. रेल्वेच्या आधुनिकीकरणावर या चर्चेत भर दिला गेला.

प्रधानमंत्री मोदी फ्रान्स दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात ते फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत 'विव्हाटेक' या जागतिक संमेलनात सहभागी होतील.

**<><><><><><>**

पीएम किसान सन्मान निधी योजनेचा २३ वा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २० जूनला पश्चिम बंगालमध्या हुगळी जिल्ह्यातल्या तारकेश्वर इथून जारी करतील. यावेळी ९ कोटी ४४ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण १८ हजार ८८० कोटी रुपये हस्तांतरित करण्यात येणार असल्याचं कृषी मंत्रालयाने सांगिततलं. याचा लाभ दोन कोटी १८ लाख महिला शेतकऱ्यांनाही होणार आहे.

**<><><><><><>**

राज्यात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी आज शांततेत मतदान झालं. यात सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांचा समावेश आहे. तर नागपूर मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान झालं.

नाशिक मतदारसंघात ६१९ पैकी ६१८ मतदारांनी आज मतदानाचा हक्क बजावला. नांदेडमधे ४५२ पैकी ४५१, अमरावती मधे ४५१ पैकी ४२७, धाराशिव-बीड-लातूर मतदारसंघात ९८८ पैकी ९८३, तर भंडारा-गोंदियामधे सर्वच्या सर्व ४५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. परभणी-हिंगोली मतदारसंघात ४६६ पैकी ४६५, सांगली-सातारा मतदार संघात ८९५ पैकी ८९४, जळगाव ६३० पैकी ६१६, सोलापूर ६१६ पैकी ६१४ तर छत्रपती संभाजीनगर - जालना मतदारसंघात ६३७ पैकी ६३० मतदारांनी मतदान केलं. तर नागपूर मतदारसंघात ९८ पूर्णांक ४४ शतांश टक्के मतदान झालं.

मतमोजणी **२२ जून**ला होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाईल.

ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, अहिल्यानगर आणि वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर या सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

<><><><><>

नीट युजी फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज दिल्लीत आढावा बैठक घेतली. पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सक्षमता यांचं परीक्षा प्रक्रीयेतलं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. केंद्राच्या आणि राज्यांच्या शिक्षण विभागातले वरिष्ठ अधिकारी, राष्ट्रीय परीक्षा संस्थेचे तसंच उच्च शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी मिळून बैठकीला २२२ जण प्रत्यक्ष किंवा दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज व्हीप जारी करत बोलवलेल्या पक्षाच्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित होते. त्यात नागेश आष्टीकर, संजय देशमुख, संजय जाधव, संजय दिना पाटील, ओमप्रकाश राजे निंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा समावेश आहे. या बैठकीला खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे यांच्यासह पक्षाचे एकमेव राज्यसभा खासदार संजय राऊत उपस्थित होते.

सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातल्या शिवसेनेत सामील होत असल्याचं पत्र लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना सादर केलं आहे. मात्र, ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसून, पडताळणीसाठी काही खासदारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणं आवश्यक आहे, असं लोकसभा सभापतींच्या कार्यालयाकडून सांगण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

जागतिक पातळीवर शैक्षणिक संस्थांचा दर्जा दाखवणारी क्वाकरेली सिमोंड्स मानांकन यादी जाहीर झाली आहे. पहिल्या २०० शैक्षणिक संस्थांच्या यादीत भारतातल्या ३ संस्थांचा समावेश आहे. आयआयटी दिल्ली ११८व्या, तर आयआयटी मुंबई १३४व्या क्रमांकावर आहे. आयआयटी मद्रास १७०व्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

गडचिरोलीतल्या ६ लोहखनिज खाणी केंद्रसरकारनं राज्य खनिज महामंडळाला द्याव्यात, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केंद्रीय कोळसा आणि खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे केली आहे. लिलाव प्रक्रीयेत उच्च प्रीमीयम मुळे अनेक खाणी व्यवहार्य राहत नाहीत, म्हणून राज्य खनिज महामंडळानं त्या चालवल्या तर खनिज उत्पादन वेगान होऊ शकेल असं फडनवीस म्हणाले. रेड्डी यांनी याबाबत सकारात्मकता दाखवली असल्याचं राज्यशासनाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कोळसा आणि लिग्नाईट गॅसिफिकेशन प्रकल्पांवरचा मुंबईतला रोड शो हा इतिहासाची पुनरावृत्ती असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. केंद्रीय कोळसा आणि खाणकाम मंत्रालयानं मुंबईत आयोजित केलेल्या रोड शोच्या वेळी ते बोलत होते. या रोड शोला केंद्रीय कोळसा आणि खाणकाम मंत्री जी. किशन रेड्डी उपस्थित होते. गॅसिफिकेशनचा मुंबईतला इतिहास यावेळी मुख्यमंत्र्यांनी उलगडला. मुंबईत १८६२मध्ये बॉम्बे गॅस कंपनीची स्थापना झाली होती. त्याकाळात जे तंत्रज्ञान उपलब्ध होतं, त्याचा वापर करून साडे चारशे किलोमीटर लांबीची गॅस पाईपलाईन सुरू केली होती. मुंबईच्या पथदिव्यांसाठी या गॅसचा वापर केला जात होता. आणि १२० वर्षं ही पाईपलाईन सुरू होती, असं

फडनवीस यांनी सांगितलं. विकसित भारतासाठी उर्जा क्षेत्र महत्त्वाचं असल्याचं ते म्हणाले..

**होल्ड... बाईट- मुख्यमंत्री (१७ सेकंद)**

**<><><><><>**

चीनमध्ये सुरु असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध चषक स्पर्धेत भारताच्या मीनाक्षी हुडा हिनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. महिलांच्या ५१ किलो गटात पोलंडच्या नतालीयावर तिनं ५-० असा विजय मिळवला. उद्या होणाऱ्या उपांत्यपूर्व सामन्यांमध्ये मीनाक्षी, स्नेहा, प्राची आणि निखिल या चार मुष्टियोद्धयांची गाठ आपापल्या प्रतिस्पर्ध्यांशी पडणार आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये मकाऊ इथे होत असलेल्या मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीत भारताच्या अश्मिता चलिहा  आणि अनमोल खरब यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. अश्मितानं अमेरिकेच्या इशिका जैस्वाल हिचा  २२-२०, २१-१५ असा पराभव केला. अनमोल खरबची प्रतिस्पर्धी असलेली मलेशियाची गोह जीन वेई हिनं सामन्यातून निवृत्ती पत्करली तेव्हा अनमोलकडे १२-४ अशी आघाडी होती.

**<><><><><>**

इ पी एफ ओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी मध्ये २०२५-२६ मधल्या ठेवींवर सव्वा आठ टक्के व्याज देण्याचा निर्णय केंद्रीय अर्थ मंत्रालयानं घेतला आहे. यामुळे सलग तीन वर्ष हा व्याजदर कायम राहिला आहे. याचा फायदा सुमारे सात कोटी ठेवीदारांना होणार आहे.

**//<><><><><>//**